पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक ११/०७/२०१९

## सी -६० पथकाने केला नक्षल कॅम्प उध्वस्त

- **मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त**

आज रोजी सकाळी ०९.३० ते १०.०० वाजताच्या सुमारास गडचिरोली पोलीस दलातील सी-६० पथकाचे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना उप विभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र हालेवारा हद्दीतील मौजा कुंडुम येथील जंगल परिसरात दबा धरुन बसलेल्या नक्षलवादयांनी सी-६० पथकाचे जवानांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचेवर गोळीबार केला. त्यामुळे सी-६० पथकातील जवानांनी स्वसंरक्षणार्थ व प्रतिउत्तरादाखल गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहुन नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

सदर घटनेनंतर परिसराची पाहणी केली असता सदर ठिकाणी नक्षलवादयांचे २५-३० पिट्टु, डेटोनेटर, कॅमेरा फ्लॅश, मल्टीमिटर व मोठया प्रमाणात दैनदिन वापराचे नक्षलवादयांचे साहीत्य आणि शस्त्रसाठा मिळुन आले. घटनास्थळाच्या परिस्थितीवरुन सदर ठिकाणी नक्षलवादी तळ ठोकुन मोठी कारवाई करण्याच्या तयारीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांच्या सतर्कतेमुळे नक्षलवांदयाचे मनसुबे उधळुन लावण्यात पोलीस दलास यश प्राप्त झाले आहे. घटनेनंतर सदर जंगल परिसरात नक्षल विरोधी अभियान तिव्र करण्यात आले आहे.